विभाग प्रमुख पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग,
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

ई-मेल:- hdahdspdkv@gmail.com फोन:- ०७२४-२२५६००१


जा.क्र.वि.प्र/पसंदुशा//वाहतूक/दरपत्रक/ 576 /२०२० दिनांक :- १०.११.२०२०

**दरपत्रक सुचना**

विषय:- विभागातील जनावरांना विद्यापीठ प्रक्षेत्रावर चारावयास नेणे तसेच दुग्धशाळेतील इतर कामे ठेका पद्धतीने करणेकरिता दर पुरविणेबाबत...

पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला येथे विभागातील जनावरांना विद्यापीठ प्रक्षेत्रावर चारावयास नेणे तसेच दुग्धशाळेतील इतर कामे ठेका पद्धतीने करणेकरिता खालील शर्ती व अटिंच्या अधीन राहून दर मागविण्यात येत असून सविस्तर दर भरणेकरीता दर पत्रक सोबत जोडले आहे.

1. दुग्धशाळेमधील कंत्राटी/ठेका पद्धतीने कामाचे दर हे प्रति दिवस प्रमाणे सोबत जोडलेल्या दरपत्रकामध्ये भरून दरपत्रक सादर करावे
2. दुग्धशाळेतील ठेका पद्धतीने कामाचे दर पुरविनेबाबत चे दरपत्रक विभाग प्रमुख, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., यांचे नावे सादर करावे व लिफाफ्यावर " **जनावरांना चारावयास नेणे तसेच दुग्धशाळेतील इतर कामे ठेका पद्धतीने करण्याचे दरपत्रक** "असा स्पष्ट उल्लेख करावा.
3. विहित नमुन्यातील दरपत्रक कार्यालयीन वेळत स. १०.३० ते सा. ५.३० वाजेपर्यंत बंद पाकीटातच स्वीकारण्यात येतील. दरपत्रक सादर करण्याची अंतिम तारीख **दि. २०.११.२०२०** असून त्याच दिवशी सा. ५.३० वा. मा. विभाग प्रमुख यांच्या कार्यालयात मंजूर समिती समक्ष उघडण्यात येतील
4. नमूद केलेले कंत्राटी कामाचे दर हे दरपत्रक मंजूर झाल्यापासून पुढील सहा महिण्याकरिता ग्राह्य राहतील.
5. दरपत्रकातील दर हे सर्व करांसहित (GST) सहित असावेत.
6. दुग्धशाळेतील कामे दैनंदिन स्वरुपाची असून दरपत्रकामधील नमूद कामांकरिता दररोज अंदाजित ६-७ कंत्राटी पुरुष मजुर दररोज पुरविणे आवश्यक राहील व नियमानुसार दैनंदिन आठ तासाचे काम राहील (सकाळी ८.०० ते सायंकाळी ४.००).
7. वरिष्ठ अधिका-यांनी दिलेल्या सूचनांचे पालन करावे लागेल. वेळेवर सांगितलेली सर्व कामे करावी लागतील.
8. सदर कामे जनावरांशी संबंधित असून दिलेल्या कामामध्ये बदल होऊ शकतो वेळेवर सांगितलेली कामे करावी लागतील.
9. सदर कंत्राटी मजूर पुरविणारे कंत्राटदार/संस्था नोंदणीकृत असणे बंधनकारक आहे. दरपत्रका सोबत कंत्राटधारकाचे/संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, जीएसटी, भविष्य निर्वाह नोंदणी, अनुभव प्रमाणपत्र, पन कार्ड, आधार कार्ड ई. प्रमाणपत्रे जोडण्यात यावीत.
10. कंत्राटी कामावर लागतांना कंत्राटी काम करणा-या मजुरांचे दोन फोटो, आधार कार्ड, व्यक्तिश: संपूर्ण माहिती, पत्ता व दोन ओळखीच्या व्यक्तींचे नावे ई. माहिती विभागास सादर करावी लागेल.
11. कामावरील कंत्राटी मजुरांचे अपघात विमा भ.नि.नि. खाते वा वेळोवेळी शासन निर्णयानुसार कंत्राटी मजुरांचे देय लाभ उपलब्ध करून देण्याची संपूर्ण जबाबदारी सेवा पुरविणारा कंत्राटदार संस्था/ठेकेदार यांची राहील.
12. कुठल्याही दिवशी कामावर हजर राहणे शक्य होत नसल्यास अशा परिस्थितीत पर्यायी व्यक्तींची व्यवस्था कंत्राटदारास/ठेकेदारास करावी लागेल.
13. दरपत्रकामध्ये नमूद कामाकरिता नेमलेल्या कंत्राटी मजुरांची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदार/ठेकेदार यांची राहील. कोणत्याही हानीची सदर कार्यालय भरपाई करून देणार नाही.
14. कंत्राटी काम करणा-या मजुरांचा जीवन विमा कंत्राटदाराने काढणे बंधनकारक राहील.
15. कंत्राटी कामाकरिता नेमलेल्या मजुरांना मदयपान किंवा धुम्रपान ई. व्यसन नसावे.
16. सदर कामे हि पूर्णत: ठेका पद्धती/कंत्राटी असल्या कारणाने मजुरांच्या वरिष्ठता यादीत कामाशी अथवा कामावरच्या हजेरीची नोंद होणार नाही व तसा कुठलाही दावा करता येणार नाही.
17. कार्यालयात केलेल्या कामाचे कोणतेही प्रमाणपत्र मिळणार नाही.
18. नमूद कामाचा ठेका मधेच/अर्धवट सोडून गेल्यास त्या महिन्याच्या कामाची मजुरी/रक्कम मिळणार नाही.
19. सदर कंत्राटदार संस्था असमाधानकारक काम करत असेल तर सदर संस्थेचे कंत्राट कोणत्याही क्षणी रद्द करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीकर्त्याकडे असतील.
20. प्रत्येक महिन्यात केलेल्या कामाच्या मजुरीचे देयक महिना संपल्यावर कार्यालयात सादर करावे लागेल.
21. केलेल्या कंत्राटी कामची शहानिशा करुन व कार्यालयीन प्रकियेनंतरच देयके काढण्यात येतील.
22. दरपत्रकामधील कंत्राटी कामाचे स्वरूप, लागणारे कंत्राटी मजूर ई. अधिक माहितीकरीता विभाग प्रमुख, पशुसवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला या कार्यालयाशी कार्यालयीन वेळेत संपर्क करावा.

विभाग प्रमुख
पशुसवर्धन व दुग्धशास्त्र विभाग
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

<u>दरपत्रक</u>

**(FORM OF QUOTATION)**

पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला **येथील 'दुग्धशाळेतील जनावरांना विद्यापीठ प्रक्षेत्रावर चारावयास नेणे तसेच दुग्धशाळेतील इतर कामे'** ठेका/कंत्राटी पद्धतीने करणेकरिता दरपत्रक

| अक्र | कंत्राटी कामाचे विवरण | दर प्रति दिवस (रुपये) |
|---|---|---|
| 1. | विद्यापीठ प्रक्षेत्रावर दररोज १५० ते २०० जनावरे चारावयास नेणे, जनावरांकरिता दररोज वैरण प्रक्षेत्रावील हिरवा चारा कापणे व कुट्टी करून गव्हाणीमध्ये टाकणे, साठवणूक केलेल्या वाळलेल्या (कडब्याची) चा-याची कुट्टी करणे, वासरांना चारणे, शेळ्या चारणे, गोठे साफसफाई करणे तसेच वैरण प्रक्षेत्रावरील चारा पिकांना पाणी देणे, वेळेवर येणारी कामे ई. | |

निविदेमधील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण:

दिनांक :

सही व शिक्का